शुक्रवार दिनांक ९ जून, २०२३ रोजी मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस खालीलप्रमाणे अधिकारी/ सभासद/ उद्योजक उपस्थित होते.
मा.श्री.गंगाथरन डी.,भा.प्र.से., जिल्हाधिकारी, नाशिक.
मा.श्रीमती आशिमा मित्तल, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
मा.श्री.संदीप पाटील महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.
मा.श्री.नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक.
मा.श्री.राजेश पाटील, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, नाशिक.
मा.श्री.निखिल पांचाल, अध्यक्ष, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असोसिएशन (आयमा), नाशिक.
मा.श्री.श्रीकांत पाटील, प्रतिनिधी, नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असोसिएशन (निमा), नाशिक.
मा.श्री.जगदिश रामदास पाटील, कृषी उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक.
मा.श्री.लि.ज.येळवे, कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक.
मा.श्री.जगन्नाथ खापरे, अध्यक्ष, Grape Exporters Association of India, नाशिक
मा.श्री.सुरज जाधव, प्रतिनिधी ई.वाय.टीम., नाशिक.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.जिल्हाधिकारी यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली व सभा बोलविण्याचा उद्देश विषद केला.

नाशिक जिल्ह्यात ODOP अंतर्गत Grapes व Paithani Saree यांचा समावेश करण्यात आलेला आहे. याविषयी चर्चा झाली असता पैठणी साडी अंतर्गत नवनवीन उत्पादन तयार करण्यात येवून त्याचे Branding, Designing, Packaging आणि Marketing याकरीता Ashoka Business School यांचेशी सामंजस्य करार करण्यात आला असल्याचे सदस्य-सचिव यांनी सांगितले.

त्यानंतर महाराष्ट्र राज्य शासनामार्फत निर्यात धोरण जाहिर होणार असल्याने या धोरणाचा मसूदा चर्चेसाठी ठेवण्यात आला व त्यावर निर्यातदार संघटनांकडून अभिप्राय/सूचना मागविण्यात आल्या.

यावर आयमाचे अध्यक्ष श्री.निखिल पांचाल यांनी सांगितले की, आयमा मार्फत Export Clinic सुरू करण्यात आले असून आयमा व Symbiosis Management यांचेमार्फत Export Manager हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे व ज्या कंपन्यांना Export Manager ची आवश्यकता असेल त्यांना उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले व खालीलप्रमाणे सूचना मांडल्या.

१. जे उद्योजक त्यांच्या उत्पादीत मालाच्या ५० टक्के निर्यात करतात त्यांना विशेष सवलती नवीन धोरणात असाव्यात.
२. APEDA चे स्थानिक कार्यालय, नाशिक मध्ये असावे.
३. DGFT चे स्थानिक कार्यालय नाशिकमध्ये असावे.
४. Market Development Assistant बाबत नवीन धोरणात समावेश असावा.
५. कोणकोणत्या उत्पादनास निर्यातीस वाव असून कुठल्या देशात आहे याविषयी धोरणांतर्गत माहिती असावी.

कृ.मा.प.

त्यानंतर श्री.जगन्नाथ खापरे, अध्यक्ष, Grape Exporters Association of India यांनी खालीलप्रमाणे सूचना मांडल्या.

१. ग्रामिण भागात द्राक्ष उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून Cold Storage करीता अखंडीत विद्यूत पुरवठा मिळणेविषयी धोरणात समावेश असावा.
२. विमानतळाकडे जातांना रस्ता अत्यंत खराब असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो व त्यामुळे द्राक्ष गाडीतच खराब होतात, त्याकरीता रस्ते चांगले असण्याकरीता धोरणात समावेश करण्यात यावा.
३. Dry Port ची सुविधा लवकरात लवकर उपलबध होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा.
४. द्राक्ष उत्पादन करणा-या शेतक-यांकरीता धोरणात विशेष तरतूद करण्यात यावी.

वरील चर्चा झाल्यानंतर निमाचे प्रतिनिधी श्री.श्रीकांत पाटील यांनी खालीलप्रमाणे सूचना सभेत मांडल्या.

१. जिल्ह्यात निर्यात वाढ होण्यासाठी Awareness Programme नियमितपणे घेण्यात यावेत.
२. Buyer-Seller Meet चे नियमितपणे आयोजन करण्यात यावे.

यानंतर मा.निर्यात आयुक्त तथा विकास आयुक्त (उद्योग), मुंबई यांनी अर्धशासकीय पत्राद्वारे दिलेल्या १० सूचनांवर सभेत झाली व त्याची जिल्ह्यात अंमलबजावणी करण्याबाबत चर्चा झाली. जिल्ह्यातून निर्यात वाढण्याच्या दृष्टीने औद्योगिक संघटना, उद्योजक व जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत नियमितपणे Awareness Programme घेण्यात यावेत असे सभेत ठरले. तसेच जिल्ह्यात Federation of Indian Export Organization (FIEO) व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने Capacity Building Programme घेण्यात येणार असल्याचे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले.

त्याचप्रमाणे जिल्ह्याचा निर्यात आराखड अंतिम करण्यात सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

तसेच ODOP व्यतिरिक्त MDMP (My District My Product) या अंतर्गत Dry Grapes (बेदाणा) व Wine (Grapes By-Product) यांचा समावेश करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.

2/6

मा.जिल्हाधिकारी
नाशिक.